चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२० जुलै, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# कोरपना पोलीसांची दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

## तिन गुन्हे नोंद करीत एकुण ११ लक्ष ९१ हजाराचा दारूचा मुद्द्‌माल जप्त

दिनांक १९/०७/२०१९ रोजी पोलीस स्टेशन कोरपना येथील पोलीस पथकाने विशेष कार्यवाही करून तिन वेगवेगळया ठिकाणी नाकाबंदी/सापळा रचुन एकाच दिवशी तिन गुन्हे नोंद करीत **०२ आरोपीसह एकुण ११,९१,६००/—रू** चा मुद्द्‌माल जप्त करून दारू तस्करी करणाऱ्या आरोपीतांच्या मुसक्या आवळल्या आहे.

१)यामध्ये वणी कडुन वनसडी कडे जाणाऱ्या नारंडा फाटा येथे नाकाबंदी लावुन संशयावरून एका चारचाकी वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये ६८ पेटया देशी दारू किं. ४,८९,६००/—रू चा मुद्द्‌मालासह एक चारचाकी टाटा सुमो ग्रॅडी वाहन क्र. एम एच ३४ एए ५५७३ किं. ६,१५,०००/—रू आणि मोबाईल फोन असा एकुण ११,०५,६००/—रू चा मुद्द्‌माल हस्तगत करण्यात आला आहे.

२)दुसरीकडे वनसडी येथे नाकेबंदी दरम्यान एका दुचाकी वाहनाची संशयावरून तपासणी केली असता देशी दारूच्या ९० निपा किं. १८,०००/—रू चा माल मिळुन आला. यावरून आरोपी नामे अश्पाक खान वसी खान वय २७ रा. बडा मोहल्ला, बेला आदीलाबाद, यास अटक करून मुद्द्‌माल आणि दुचाकी हिरो होंडा स्प्लेंडर क्रं. एमएच ३४ के २९१३ किं. २०,०००/—रू असा एकुण ३८,०००/—रू चा मुद्द्‌माल हस्तगत करण्यात आला आहे.

३)तिसरीकडे सोनुर्ली गावाजवळ नाकाबंदी दरम्यान संशयावरून एका दुचाकी वाहनाची तपासणी केली देशी दारूच्या ९० निपा किं. १८,०००/—रू चा माल मिळुन आला. यावरून आरोपी नामे रिजवान शेख मुस्ताक शेख २१ रा. बडा मोहल्ला, बेला आदीलाबाद, यास अटक करून मुद्द्‌माल आणि दुचाकी क्रं. एपी. ०१ एजी ४९५६ किं. ३०,०००/—रू असा एकुण ४८,०००/—रू चा मुद्द्‌माल हस्तगत करण्यात आला आहे.

तिन्ही गुन्हे पोलीस स्टेशन कोरपना येथे नोंद करण्यात आले असुन पुढिल तपास सुरू आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात कोरपना पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. कोसुरकर, यांचे नेतृत्वात सफौ. प्रकाश इखारे, पोहवा. प्रभाकर जाधव, पोना. संदीप मुंढे, नितेश महात्मे, हेमंत धवने, पोशि. अशोक मडावी, शैलेंद्र सेलोटे, रामचंद्र पुष्पपोळ, बिबिशन खटके, मपोशि. विद्या राठोड यांनी पार पाडली.

---

# माजरी पोलीसांची दारू तस्करांविरूध्द धडाकेबाज कार्यवाही २८० पेटया देशी दारूचा मुदद्देमाल जप्त

दिनांक २०/०७/२०१९ रोजी माजरी पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी वाहनाने मौजा वणी वरोरा रोडने दारूची तस्करी करणार आहे. आणि त्यांची पायलेटींग एका दुचाकीद्वारे दोन इसम करीत आहे. अशी माहिती मिळताच माजरी पोलीसांनी तात्काळ पाटाळा फाटा येथे पोहचुन नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणी करीत असतांना मिळालेल्या माहिती प्रमाणे समोरून एक दुचाकी येतांना दिसली, ज्यावर दोन इसम फोन वर काहीतरी बोलत आहे असे दिसुन आले. सदर इसमांना थांबवुन त्यांची विचारपुस करून त्यांना ताब्यात घेताच समोरून एक टाटा ११०९ टेम्पो येतांना दिसला. सदर वाहनास संशयावरून थांबविण्याचा प्रयत्न केला असता वाहन चालक वाहन न थांबता वाहनासह पुढे निघुन गेला. यावरून सदर वाहनाचा पाठलाग करून काही अंतरावर सापळा रचुन वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये २८० पेटया देशी दारू किं. २८,००,०००/—रू चा दारूचा माल मिळुन आला. सोबतच दारू वाहतुकीकरीता वापरलेला टाटा ११०९ टेम्पो एमएच ११ एएल ०५१५ किं. १०,००,०००/—रू, एक केटी.एम. डयुक बाईक किं. १,००,०००/—रू तिन मोबाईल फोन १२,०००/—रू असा एकुण **३९,१२,०००/—रू** चा मुदद्देमाल जप्त करण्यात आला. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन माजरी येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे १) रवि लक्ष्मण कुऱ्हाडेकर वय २५ रा. बुध्दनगर जुनोना चौक बाबुपेठ चंद्रपुर, २) प्रनित तुकाराम झिले वय १९ रा. महात्मा फुले चौक बाबुपेठ चंद्रपुर, ३) रविंद्र नारायण मांढरे वय २९ रा. बाबुपेठ चंद्रपुर यांना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास माजरी पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात माजरी प्रभारी सपोनि. श्री. ढाकणे, यांचे नेतृत्वात पोहवा. गजानन तुपकर, पोशि. अनिल बैठा, नितेश लांडे, श्रीकांत मोगरम, प्रदिप गाडेकर यांनी पार पाडली.

———————————————————————————————————

# दुचाकी चोरी करणारा अटट्ल चोर स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

## आरोपीकडुन चोरीच्या १८ दुचाकी हस्तगत

जिल्हयातील दुचाकी चोरीच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा व्हावा आणि वाहनांचा शोध लागावा याकरीता मा.डॉ.महेश्वर रेडडी पोलिस अधिक्षक चंद्रपुर, यांचे मार्गदर्शनात दुचाकी शोध मोहिम राबविण्यात आली. याकरीता स्थानिक गुन्हे शाखेचे एक विशेष पथक तयार करून दाखल असलेल्या चोरीच्या गुन्हयातील वाहनांचा आणि वाहन चोरी करणाऱ्यांची शोध मोहिम सुरू केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक राजुरा आणि गडचांदुर उपविभागात रवाना झाले. उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती काढुन पोलीस स्टेशन कोरपना हद्दीतील मौजा पारधीगुडा येथील प्रदिप संजय शेरकुरे वय १९ वर्ष यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने काही दिवसापुर्वी राजुरा येथुन एक होन्डा ॲक्टीवा चोरी केल्याची कबुली दिल्याने, सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्याची कसुन चौकशी केली असता, त्याने यापुर्वी कोरपना, आदिलाबाद, वणी, यवतमाल यापरिसरातुन सुध्दा दुचाकी चोरी केल्याचे कबुल केले. यावरून सदर आरोपीकडुन वेगवेगळया ठिकाणी लपवुन ठेवलेल्या एकुण १४ दुचाकी किं. ७,००,०००/—रू चा मुद्देमाल स्थनिक गुन्हे शाखेच्या पथकाने जप्त केला. सोबतच सदर आरोपीने कबुली दिली की, त्यांने दिनांक १६/०७/२०१९ रोजी सुध्दा ०४ दुचाकी वाहन चोरी केले होते ते वाहने सुध्दा त्याचे कडुन जप्त करण्यात आले आहे. सदर जप्त केलेल्या वाहनामधुन पोलीस स्टेशन रामनगर येथील ०३ गुन्हे, राजुरा येथील ०१ गुन्हा, पडोली येथील ०१ गुन्हा, दुर्गापुर येथील ०१ गुन्हा, पोलीस स्टेशन वणी येथील ०२ गुन्हे, शिरपुर येथील ०१ गुन्हा उघडकीस आला आहे. उर्वरीत दुचाकी हया कोठुन चोरी गेलेल्या आहे याबाबत तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.डॉ.महेश्वर रेडडी पोलिस अधिक्षक चंद्रपुर, श्री.प्रशांत खैरे अपर पोलिस अधिक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर यांचे नेतृत्वात पोउपनि गदादे, पोहवा राजेद्र खनके, पोहवा विजय संगीडवार, नापोकॉ चंदु नांगरे, नापोकॉ जमिर पठाण, नापोकॉ मिलिंद चव्हाण, नापोकॉ अविनाश दशमवार, नापोकॉ, पोशि विनोद जाधव, पोशि संदिप मुळे व चापोकॉ वामन ढाकणे यांनी महत्वाची भुमिका बजावली आहे.

---